CNR No. MHRG120000532021

नियमीत दिवाणी दावा क्र. ५/२०२१

रामचंद्र वि. आनंदी

## निशाणी क्र.१३ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज लेखी जबाब आणि म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब किंवा म्हणणे स्विकारण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, कोविड १९ या साथीच्या रोगामुळे प्रतिवादी मुदतीत लेखी जबाब व म्हणणे दाखल करु शकले नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादीने प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी आणि वादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील विलंबाचे कारण संयुक्तीक असल्यामुळे प्रतिवादी यांचा लेखी जबाब आणि म्हणणे अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. याशिवाय दाव्याचा निकाल गुण अवगुणावर लागण्यासाठी प्रतिवादी यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे सुध्दा आवश्यक ठरते. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांचे लेखी आणि म्हणणे अभिलेखावर घेण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १६/०९/२०२१

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

मुरूड